




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २१० ● पुणे ● बुधवार, दि. ०२ जुलै २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





चाकणकरांच्या उपस्थितीत आढावा बैठक 3



ICC महिला टी२० मानांकन; मानधना तिसऱ्या क्रमांकावर 4

## ठळक बातम्या



### सिंहगड रस्त्याच्या पर्यायी मार्गावर राडारोडा

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रस्त्याला पर्यायी रस्ता असलेल्या वडगाव ते पु. ल. देशपांडे उद्यान दरम्यानकालव्यालगतच्या रस्त्यावर महापालिकेच्या नावाने दोन्ही बाजूंना राडारोडा टाकला जात आहे. भरदिवसा हे प्रकार सुरू असूनही महापालिका प्रशासनाला मात्र कल्पना नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. उड्डाणपुल होण्यापूर्वी पर्यायी मार्ग म्हणून वडगाव ते पु. ल. देशपांडे (जनता वसाहत) दरम्यान नवीन मुठा कालव्यालगत ७.५ मीटर रुंदीचा रस्ता तयार करून तो वाहतुकीसाठी खुला केला. मात्र, या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना राडारोडा टाकला जात आहे. मोठे डंपर येऊन राडारोडा खाली करतात. हा राडारोडा कोणाचा आहे, असे विचारल्यानंतर हा राडारोडा महापालिकेचाच असल्याचे सांगितले जाते. याबाबत पथ विभाग आणि सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना विचारल्यानंतर त्यांना काहीच कल्पना नसल्याचे समोर आले. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे म्हणाले की, याची माहिती घेऊन राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल.

### राज्यात कोरोनाची परिस्थिती नियंत्रणात

पुणे (आरंभ पर्व) : राज्यात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या नियंत्रणात असून बरे होण्याचे प्रमाण ९४.५६ टक्क्यांवर पोहोचले आहे. जानेवारीपासून आतापर्यंत राज्यात एकूण २९ हजार ७५७ चाचण्या केल्या, त्यापैकी २ हजार ५०१ रुग्ण पॉझिटिव्ह आढळले. यापैकी २ हजार ३६५ रुग्ण म्हणजेच ९४.५६ टक्के पूर्णपणे बरे झाले. सध्या राज्यात केवळ ९८ सक्रिय रुग्ण असून बहुतांश रुग्णांमध्ये सौम्य लक्षणे आढळली आहेत. ३० जूनला एकाच दिवशी १३ नवीन रुग्ण नोंदविले. यामध्ये पुणे, मुंबई, कोल्हापूर, रायगड व इतर महापालिकांमधील रुग्णांचा समावेश आहे. राज्य सरकारने इन्फ्लूएंझासदृश लक्षणे (आयएलआय) आणि गंभीर श्वसन संक्रमण (सारी) असणाऱ्या रुग्णांची नियमित तपासणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या तपासण्या आणि नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठवले जात आहेत.

### पुण्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता

पुणे (आरंभ पर्व) : गेल्या अनेक दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने मंगळवारी (ता. १) हजेरी लावली. परिणामी कमाल तापमानात किंचित घट झाली. पुढील तीन ते चार दिवस कमाल तापमानात घट होणार असून, पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुणे आणि परिसरात मंगळवारी सकाळी ढगाळ वातावरण होते, तर सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरात हलक्या स्वरूपाच्या पावसाने हजेरी लावली.

# मास्क घालून आले, बंदूक दाखवली आणि सोनं घेऊन पसार

## पुण्यातील आंबेगाव बुद्रुक येथील धक्कादायक प्रकार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भरदिवसा बंदुकीच्या धाकाने वडगाव बुद्रुक येथील सराफी पेढी लुटल्याचा प्रकार समोर आला आहे. दुचाकीवर तोंडाला मास्क लावून आलेल्या तिघांनी येथील गजानन ज्वेलर्समध्ये घुसून महिलेला मारहाण करत शस्त्राच्या धाकाने पाच सोनसाखळी आणि एक नेकलेस असा पाच तोळे सोन्याचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून पळ काढला.

दरम्यान, घटनेनंतर पसार झालेले तिघे आरोपी एका चारचाकी गाडीच्या डॅश कॅमेऱ्यात कैद झाले असून, सिंहगड पोलीस आणि गुन्हे शाखेची पथके त्यांच्या मागावर आहेत. याप्रकरणी सिंहगड पोलीस ठाण्यात जबरी चोरी, आर्म ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंगल घाडगे (55, रा. सदाशिव दांगट नगर, आंबेगाव बुद्रुक) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार




तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास वडगाव, रेणुका नगरी परिसरात असलेल्या गजानन ज्वेलर्स येथे ही घटना घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे पती शंकर यांनी मंगळवारी सकाळी नेहमीप्रमाणे दुकान उघडले. काही वेळानंतर फिर्यादीचे पती एका अंगठीची डिलेव्हरी ग्राहकाला देण्यासाठी दुकानाबाहेर पडले. त्यावेळी फिर्यादी या एकट्याच दुकानात होत्या. दरम्यान दीडच्या सुमारास दुचाकीवरून आलेले तिघेजण थेट दुकानात शिरले. त्यांनी तोंडाला मास्क लावले होते. तर त्यांच्याकडे पिस्तूल होते. त्यांनी काउंटरवर बसलेल्या फिर्यादी यांना मारहाण करीत धमकावले.

## गजानन ज्वेलर्समध्ये घुसून महिलेला मारहाण

### धायरीतील 'श्री ज्वेलर्स'कडून कोट्यवधींची फसवणूक



**धायरीतील श्री ज्वेलर्सचा मालक कृष्णा दहिवळ याच्यावर हजारो महिलांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा गंभीर आरोप आहे. फ्लॅट, सोनं आणि विविध भिशी (चिट फंड) योजनांच्या माध्यमातून त्याने अनेक नागरिकांकडून पैसे गोळा केले. पीडित महिलांच्या म्हणण्यानुसार, श्री ज्वेलर्सने त्यांचा विश्वास संपादन करून पैसे घेतले, पण त्याबदल्यात केवळ पोकळ आश्वासनं दिली. प्राथमिक अंदाजानुसार, ही फसवणूक २ ते २.५ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली असून, तक्रारींची संख्या सातत्याने वाढत आहे. अनेकांनी कृष्णा दहिवळसोबत १०-१२ वर्षांपासून आर्थिक व्यवहार केले होते, त्यामुळे त्यांनी कोणतीही शंका न घेता आपली आयुष्यभराची कमाई त्याच्याकडे गुंतवली होती. फसवणुकीचं वास्तव समोर आल्यानंतर, श्री ज्वेलर्सच्या दुकानासमोर महिलांनी प्रचंड आक्रोश व्यक्त केला.**

पिस्तुलाचा धाक दाखवून महिला बसलेल्या काउंटर पाठीमागील शोकेसमधून हाताला येईल तेवढे सोने घेऊन आरोपी पसार झाले. आरोपींनी महिलेला मारहाण केली असून, त्यांच्या डोक्यात दुखापत झाली आहे. महिलेने आरडाओरड करताच नागरिकांनी दुकानाच्या आवारात गर्दी केली. तोपर्यंत आरोपींनी तेथून पळ काढला होता. नंबर प्लेट नसलेल्या काळ्या रंगाच्या दुचाकीवरून तिघे पळू जाताना दिसून येते आहेत. हा प्रकार एका चारचाकी गाडीच्या डॅश कॅमेऱ्यात कैद झाल आहे. तिघांनी आपले चेहरे झाकले असून, पाठीमागे बसलेल्या एक व्यक्ती पिस्तूल दाखवत दहशत निर्माण करत असल्याचे दिसून येते आहे. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सिंहगड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे निरीक्षक उत्तम भजनावळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

## भक्तांशी अश्लील चाळे करणाऱ्या भोंदूच्या पोलीस कोठडीत वाढ



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दैवी शक्ती प्राप्त झाल्याची बतावणी करून भक्तांशी अश्लील चाळे करणाऱ्या भोंदूच्या पोलीस कोठडीत ४ जुलैपर्यंत वाढ करण्याचे आदेश मंगळवारी न्यायालयाने दिले. प्रसाद दादा उर्फ बाबा उर्फ प्रसाद दादा भीमराव तामदार (वय २९, रा. सूस गाव, मुळशी) असे अटक केलेल्या भोंदूचे नाव आहे.

याबाबत एकाने बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत मंगळवारी संपल्यानंतर त्याला शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीकडून तीन मोबाइल संच, एक डिजिटल पॅड, सहा पेनड्राइव्ह, चार मेमरी कार्ड, तसेच निद्रानाशावरील गोळ्यांचे पाकीट जप्त करण्यात आले आहे. आरोपीने एका ॲपद्वारे भक्तांचे चित्रीकरण केले. त्याने अनेकांची फसवणूक केल्याची शक्यता आहे.

फसवणूक करून मिळविलेल्या पैशांमधून त्याने मालमत्ता खरेदी केली का? तसेच त्याची संस्था कायदेशीर आहे का? याद्दष्टीने तपास करायचा असल्याने तामदार याच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सारंग ठाकरे आणि सरकारी वकील विजयसिंह जाधव यांनी न्यायालयात केली. न्यायालयाने तामदार याच्या पोलीस कोठडीत चार जुलैपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले.

## बाह्यवळण मार्गावर प्रवाशाला लुटणारे चोरटे गजाआड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर एका प्रवाशाला धमकावून लुटणाऱ्या मोटारचालकासह साथीदाराला सिंहगड रस्ता पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांकडून गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटार आणि मोबाइल संच असा चार लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

निखील अरविंद पवार (वय २७, रा. मातोश्रीनगर, आंबेगाव बुद्रुक, कात्रज), रोहन शाम पवार (वय २७, रा. नऱ्हे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. ३० मे रोजी रात्री तक्रारदार तरुण मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर बसची वाट पाहत थांबला होता. तो कोल्हापूरला निघाला होता. त्या वेळी आरोपी पवार हे मोटारीतून तेथे आले. त्यांनी तरुणाला कोल्हापूरला सोडतो, अशी बतावणी केली. त्यानंतर धावत्या मोटारीत पवार आणि साथीदारांनी तरुणाला शस्त्राचा धाक दाखविला.



तरुणाला मारहाण करुन त्याच्याकडील रोकड, मोबाइल संच, सोनसाखळी असा मुद्देमाल लुटून आरोपी पवार पसार झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते. प्रवासी तरुणाला लुटणारा चोरटा नऱ्हे भागातील भूमकर चौकात थांबल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी देवा चव्हाण, सागर शेडगे, निलेश भोरडे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी निखील पवारला सापळा लावून ताब्यात घेतले. चौकशीत साथीदार रोहन पवार याचे नाव समजले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक उत्तम भजनावळे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, संजय शिंदे, उत्तम तारू, अण्णा केकाण, विकास बांदल, राहुल ओलेकर, गणेश झगडे, विनायक मोहिते, सतीश मोरे, संदीप कांबळे, तानाजी सागर, समीर माळवदकर, शिरीष गावडे यांनी ही कारवाई केली.

## मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर पाणीपातळीच्या खुणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पावसाळ्यात धरणातून नदीत पाणी सोडल्यानंतर तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे नदीच्या पातळीत किती वाढ झाली, हे निश्चित करण्यासाठी महापालिकेने पुलांच्या खांबांवर पाणी पातळीच्या खुणा (मार्किंग) करण्याचा निर्णय घेतला आहे. खडकवासला धरणापासून संगमवाडीपर्यंतच्या मुठा नदीवरील पुलांच्या खांबांवर या खुणा करण्यात येणार आहेत.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाला हे आदेश दिले आहेत. यामुळे धरणातून नदीत किती पाणी सोडले की कोणत्या भागात पाणी शिरू शकते, याची माहिती महापालिका प्रशासनाला समजण्यास मदत होणार आहे. धरणातून विसर्ग केल्यानंतर. तसेच खुल्या पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्यामुळे नदीची पातळी नक्की किती वाढते, हे लक्षात यावे, यासाठी हे केले जाणार आहे.

# गृहमंत्री अमित शहा शुक्रवारी पुण्यात

## अश्वारूढ पुतळ्याचे 'एनडीए'त अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

थोरले बाजीराव पेशवे यांचा खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे शुक्रवारी (४ जुलै) केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते अनावरण होणार आहे.

प्रबोधिनीमध्ये सकाळी पावणेअकरा वाजता होणाऱ्या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे, थोरले बाजीराव पेशवे यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा, प्रबोधिनीचे कमांडंट ॲडमिरल गुरचरण सिंह उपस्थित राहणार आहेत.




अजेय योद्धा श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या स्मृती कायम स्मरणात रहाव्यात या भावनेने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले प्रतिष्ठानचे अध्यक्ष असून, कुंदनकुमार साठे सचिव आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचा भव्य अश्वारूढ पुतळा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे उभारण्यासाठी माजी खासदार विनय सहस्रबुद्धे यांच्या मदतीने अमित शहा यांनी सहकार्य केल्याने पुतळा उभा करण्याची परवानगी मिळाली. सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे यांचेही पुतळा उभारण्यात सहकार्य लाभले आहे.

थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्या वतीने साडेतेरा फूट उंचीचा पुतळा उभारण्यात आला आहे. चार हजार किलो ब्रॉंझचा वापर करून विपुल खटावकर यांनी या पुतळ्याची निर्मिती केली आहे.

'अवघ्या चार दशकांच्या आयुष्यात श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी लढलेल्या प्रत्येक युद्धात विजय मिळविला होता. प्रबोधिनीतील छात्रांना अजेय योद्धा पेशवे यांचा भव्य पुतळा कायम प्रेरणादायी ठरेल,' अशी भावना भूषण गोखले आणि कुंदनकुमार साठे यांनी व्यक्त केली.

## पुण्यात स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू तर तिघे जण गंभीर जखमी

### कॅम्प परिसरातील साचा पीर स्ट्रीट रोडवरील घटना



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शहरातील कॅम्प परिसरात एका इमारतीचे काम सुरू असताना स्लॅब कोसळून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कॅम्प परिसरातील साचा पीर स्ट्रीट रोडवरील एका इमारतीचे दुपारच्या सुमारास स्लॅब भरण्याचे काम सुरू होते. त्यावेळी अचानक स्लॅब कोसळला आणि त्यामध्ये चार जण खाली पडले. घटनेमध्ये शुभंकर मंडल या कामगारांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली असून अन्य तीन कामगार गंभीर जखमी झाले आहे.

# गोंधळी नको; विरोधक अभ्यासू हवेत...



राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही.

शेतकऱ्यांबद्दल कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केले होते.

या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.



लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांना लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा अशी धडपड त्यात अनेकांची पाहायला मिळते; परंतु विधिमंडळाच्या आवारात केलेले आंदोलन हे रेकार्डवर नसते. ते दिवसभरातील एक प्रकारे मनोरंजन होते.

विधानसभेचे २८८ आमदार आहेत. ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आमदाराला आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याची संधी विधानसभेत मिळायला हवी असते; परंतु असे गोंधळ होत राहिले तर, आमदारांना जनतेच्या समस्यांवर प्रश्न विचारण्याची संधी कशी मिळेल? याचा अन्य सदस्यांनी विचार करायला हवा. आजचे उदाहरण घेऊ या... नाना पटोले यांनी अध्यक्षांच्या दालनांपर्यंत जाऊन गोंधळ घालण्याची खरंच गरज होती का? विधिमंडळ हे कायदे मंडळ आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय विधेयक बहुमताने पारित करून केले जातात. त्यामुळे विधानसभा अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीचा मान मोठा आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि विधानसभा अध्यक्ष यांचा दर्जा हा सारखा असतो. त्यामुळे, नाना पटोले यांच्यासारख्या विधानसभा अध्यक्षपद आधी भूषविलेल्या लोकप्रतिनिधींनी पदाचा मान राखायला हवा होता. पटोले यांनी काँग्रेस पक्षासारख्या राष्ट्रीय पक्षाची राज्याची धुराही सांभाळलेली आहे. तरीही त्यांचा संयम सुटला. पटोले यांच्यावरील कारवाईनंतर, विरोधी पक्षाच्या सदस्यांनी कामकाजावर बहिष्कार टाकण्याचा जो निर्णय घेतला, त्यातून जनतेच्या प्रश्नांवर विरोधक संवेदनशील नाहीत, हे पुन्हा एकदा दिसून आले.

'नेमेचि येतो पावसाळा' याप्रमाणे विधिमंडळ सचिवालयाकडून वर्षातून तीन अधिवेशने होत राहतील. या अधिवेशनासाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करावी लागते. तो पैसा जनतेच्या करातूनच खर्च केला जातो. त्यामुळे विरोधकांनी विधिमंडळाच्या कामकाजावर भर देत, जो जनतेचा आवाज आहे, तो सभागृहात मांडण्याकडे लक्ष द्यायला हवे. महाराष्ट्र विधानसभेची आजची स्थिती अशी आहे की, विरोधी पक्षाच्या आमदारांकडे पुरेसे आमदार नसल्याने विरोधी पक्ष नेते पदावर कोणाची वर्णी लागलेली नाही. आपले संख्याबळ कमी असताना, जास्तीत जास्त सभागृहात बाजू मांडणे हे लोकशाहीच्या दृष्टीने हिताचे आहे. सभागृहात आमदारांनी मांडलेला मुद्दा हा रेकॉर्डवर घेतला जातो. त्यामुळे एखाद्या आमदारांने अभ्यासपूर्ण केलेले भाषण हा पुढील काळात संदर्भ म्हणून वापरला जाऊ शकतो, याचे भान प्रत्येक आमदारांनी ठेवायला हवे.

# कॅसाग्रँडने आपल्या प्रोजेक्ट कॅसाग्रँड कॅलॅडियमसह पुण्यात प्रवेश

- **पश्चिम भारतासाठी ब्रँड ॲम्बेसडर्स म्हणून जेनेलिया आणि रितेश देशमुख यांची घोषणा"**
- **अप्पर खराडी येथे स्थित कॅसाग्रँड कॅलेडियम, सिंगापूर शैलीतील उंच इमारती, अतिरिक्त प्रशस्त २ आणि ३ बीएचके अपार्टमेंट्स, ११०+ जागतिक दर्जाच्या सुविधा आणि बरेच काही, १.०५ कोटी रुपयांपासून सुरू**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट डेव्हलपर्सपैकी एक असलेल्या कॅसाग्रँडने आज पुण्यातील त्यांच्या अप्पर खराडी येथील पहिला प्रकल्प असलेल्या कॅसाग्रँड कॅलेडियमच्या अनावरणाची घोषणा करण्यासाठी शहरात एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला पश्चिम भारतातील त्यांच्या ब्रँड ॲम्बेसेडर श्रीमती जिनिलिया आणि श्री. रितेश देशमुख, तसेच कॅसाग्रँडचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. अरुण एमएन उपस्थित होते.

विश्वासार्हता, उत्तम कौटुंबिक मूल्ये आणि आकर्षण यासाठी ओळखले जाणारे हे दोघे विश्वास, गुणवत्ता आणि आनंददायी गोष्टींवर आधारित घरेग्राहकांसाठी तयार करण्याच्या कॅसाग्रँडच्या नीतिमत्तेचे उत्तम प्रतिबिंब आहेत. श्रीमती जिनिलिया आणि श्री. रितेश देशमुख यांच्याशी ब्रँडचे संबंध शहरातील घर खरेदीदारांशी अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्याच्या कंपनीच्या प्रयत्नांचे प्रतिबिंब दर्शवतात आणि त्याचबरोबर बांधकाम क्षेत्रात विकसित होत असलेल्या जीवनशैलीच्या गरजा पूर्ण करणारी उच्च-गुणवत्तेची, आधुनिक, अतिरिक्त प्रशस्त, सर्वोत्तम किमतीची घरे देण्यासाठी वचनबद्ध राहतात. त्यांची सार्वजनिक स्तरावरील प्रतिमा आणि महाराष्ट्राशी खोलवर रुजलेले संबंध त्यांना आदर्श राजदूत बनवतात, कारण ब्रँड या प्रदेशातील घर खरेदीदारांशी अर्थपूर्ण भावनिक संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. ब्रँडने त्यांच्यासह सर्वांगीण मार्केटिंग मोहिमेची योजना आखली आहे. त्यातून कॅसाग्रँड कॅलेडियमच्या यूएसपीला अधोरेखित केले जाईल.

या कार्यक्रमात बोलताना कॅसाग्रँडचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री अरुण एमएन म्हणाले, "आम्ही २००३ मध्ये इच्छुक घर खरेदीदारांना सर्वोत्तम किमतीत उत्कृष्ट उत्पादने देण्याच्या उद्देशाने आमचा प्रवास सुरू केला होता. गेल्या काही वर्षांत, आम्ही वेगाने विकास केला आहे परंतु आमचे ध्येय तेच राहिले आहे. आम्ही प्रवेश केलेल्या प्रत्येक बाजारपेठेत आम्ही विचारपूर्वक तयार केलेली सर्वोत्तम किमतीची घरे आणली आहेत आणि ती राहणीमानाचा अनुभव उंचावतात. आमची अनोखी रचना, उच्च दर्जाची, आधुनिक सुविधा आणि वैशिष्ट्ये, ग्राहककेंद्रित दृष्टिकोन यामुळे आम्हाला शहरातील घर खरेदीदारांमध्ये एक दृढ विश्वासार्हता निर्माण करण्यास मदत झाली आहे. आज आमच्या प्रवासातील एक महत्त्वाचा दिवस आहे कारण आम्ही पश्चिम भारतात पाऊल ठेवत आहोत, पुण्यात आमचा पहिला प्रकल्प, कॅसाग्रँड कॅलेडियम सुरू करत आहोत. हा पुण्याच्या बाजारपेठेसाठी अतिशय विचारपूर्वक डिझाइन केलेला, विशेषतः तयार केलेला प्रकल्प आहे आणि आम्हाला श्रीमती जेनेलिया आणि श्री. रितेश देशमुख यांच्यासोबत कामकरताना खूप आनंद होत आहे, कारण ते विश्वास, सापेक्षता, मजबूत मूल्ये आणि खोलवर रुजलेले नाते आणतात. त्यावर आम्ही दृढ विश्वास ठेवतो. आम्हाला खात्री आहे की, त्यांच्याशी आमच्या सहकार्याने आम्ही शहरी क्षेत्राचे नवीन मानक स्थापित करून शहरात महत्त्वाची कामगिरी करू शकू." याबाबत पुढे बोलताना श्रीमती जिनिलिया आणि श्री. रितेश देशमुख म्हणाले, "पश्चिम भारतातील कॅसाग्रँडच्या प्रवासाचा भाग होण्यास आम्हाला खरोखरंच आनंद होत असून घरे बांधण्याइतकेच विश्वास निर्माण करण्यावर काम करणाऱ्या ब्रँडचे प्रतिनिधीत्व करताना आम्हाला अभिमान वाटतो. आमच्यासाठी घर नेहमीच फक्त एक जागा नसून बरेच काही आहे. ते असे ठिकाण आहे जिथे प्रेम वाढते, स्वप्ने आकार घेतात आणि प्रत्येक कोपरा एक कथा सांगतो. कॅसाग्रँडचा अनुभव घेताना आम्हाला नेमके हेच वाटले. त्यांनी तपशीलांकडे बरेच लक्ष दिले असून त्यांना कुटुंबांच्या राहणीमानाच्या गरजांची सखोल समज आहे. तसेच केवळ घरेच नव्हे तर त्याहूनही अधिक प्रगत, अद्वितीय निवास बांधण्याची त्यांची वचनबद्धता, यामुळे आम्हाला खरोखरंच प्रेरणा मिळाली.

पुण्यातील बाजारपेठ समजून घेण्यासाठी त्यांनी किती मेहनत घेतली आणि त्यानुसार कॅसाग्रँड कॅलॅडियम डिझाइन केले हे पाहून आम्हाला आनंद होतो. आत्मविश्वासाने आम्ही अभिमानाने म्हणू शकतो की, पुण्याला या प्रकल्पाकडून बरीच अपेक्षा करता येईल."

## राजगुरुनगर बँकेच्या
# अध्यक्षपदी सागर पाटोळे तर उपाध्यक्षपदी आश्विनी पाचारणे बिनविरोध

**राजगुरूनगर - किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**





राजगुरूनगर येथील राजगुरुनगर सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी सागर काळुराम पाटोळे यांची तर उपाध्यक्षपदी आश्विनी राजेंद्र पाचारणे यांची बिनविरोध निवड झाली.

बँकेचे मावळते अध्यक्ष दिनेश ओसवाल आणि उपाध्यक्ष अविनाश कहाणे यांनी पदाचा राजीनामा दिला होता. रिक्त झालेल्या पदांसाठी मंगळवारी (दि. १) निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक सचिन सरसमकर यांनी संचालकांची विशेष सभा बोलावली होती. अध्यक्ष पदासाठी सागर पाटोळे यांच्यासह ज्येष्ठ संचालिका विजया शिंदे यांचे अर्ज दाखल झाले. उपाध्यक्ष पदासाठी आश्विनी पाचारणे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. निर्धारित वेळेत विजया शिंदे यांची माघार झाल्याने सरसमकर यांनी बिनविरोध निवडीची घोषणा केली. अध्यक्ष पाटोळे व उपाध्यक्ष पाचारणे यांच्या बिनविरोध निवडीनंतर समर्थकांनी फटाके फोडून आणि भंडारा उधळुन जल्लोष केला. सागर पाटोळे हे बँकेच्या दोन पंचवार्षिक मध्ये संचालक म्हणून निवडून आले असून वडगाव पाटोळे (ता. खेड) ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आहेत. मागील पंचवार्षीक काळात त्यांनी उपाध्यक्षपदी कामकाज केले. तर उपाध्यक्ष अश्विनी पाचारणे या सन २०२२ मध्ये पहिल्यांदा संचालक झाल्या आहेत.

यावेळी बँकेचे माजी अध्यक्ष किरण आहेर, राजेंद्र सांडभोर, दत्ता भेगडे, दिनेश ओसवाल, अविनाश कहाणे, गणेश थिगळे, राहुल तांबे पाटील, विनायक घुमटकर, राजेंद्र वाळुंज, समीर आहेर, अरूण थिगळे, विजय डोळस, सचिन मांजरे, रामदास धनवटे, महेश शेवकरी तसेच नवनिर्वाचीत अध्यक्ष व त्यांचे समर्थक सभागृहात उपस्थित होते.

# लोकमंगलच्या शाखाधिकाऱ्यानेच केला बनाव; तपासात पोलिसांना यश

**धाराशिव (दै. आरंभ पर्व)**

नळदुर्ग (ता. तुळजापूर) येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या शाखाधिकाऱ्याने सोलापूरकडे रक्कम घेऊन जाताना लुटल्याचा बनाव करत २५ लाख हडप केल्याचा प्रयत्न केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. अवघ्या २४ तासात पोलिसांनी या घटनेचा छडा लावला. दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यानी डोळ्यात मिरची टाकून २५ लाख पळविले म्हणून पोलिसांना सांगणारा लोकमंगल को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीचा शाखाधिकारी कैलास घाटे यांने बनाव करून स्वतःच्या फायद्यासाठी २५ लाख रुपये स्वतःजवळच ठेवल्याचे उघड झाले आहे.

# अध्यक्षपदी डॉ. सांगोलेकर, स्वागताध्यक्षपदी डॉ. भोसले





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वबंधुता साहित्य परिषद आणि रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालय यांच्या वतीने पुढील महिन्यात पिंपरी येथे होणाऱ्या बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी आणि शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक, गझलकार व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी मराठी विभागप्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांची, तर स्वागताध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. पांडुरंग भोसले यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली. डॉ. सांगोलेकर यांच्या स्वलिखित १५ आणि संपादित १२ अशा २७ साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. त्यातील 'मराठी गझल: १९२० ते १९८५', 'दलित साहित्यः प्रवाह आणि प्रकार' या विशेष लोकप्रिय झाल्या आहेत. डॉ. भोसले हे गेल्या ३५ वर्षांपासून रयत सेवक म्हणून कार्यरत आहेत. २६ पुस्तकाचे त्यांनी संपादन केले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील चर्चासत्रात सहभागी होऊन ४३ शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांच्या काव्य व लेखणीला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

# थोडक्यात



## पुण्यातील ३० विद्यार्थ्यांची वर्ल्ड वाईड बुक रेकॉर्डमध्ये नोंद

**पुणे (आरंभ पर्व) : एस. सी. मास विद्यार्थ्यांनी तिसऱ्यांदा वर्ल्ड वाईड बुक रेकॉर्डमध्ये नोंद केली असून एक अंकी ते चार अंकी नंबर एकात एक मिळवत ३० मुलांनी एक मिनिट २० सेकंड्समध्ये गणिते सोडवून "वर्ल्ड वाइड बुक ऑफ रेकॉर्ड" मध्ये नोंद केली आहे. हे विद्यार्थी पुण्यातील वेगवेगळ्या शाळेतील असून त्यांना एकत्रित करून, एस सी मास संस्थेच्याच्या व्यवस्थापक सुजाता हलवाई यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुलांकडून सराव करून घेवून त्यांची तिसऱ्यांदा वर्ल्ड वाईड बुक रेकॉर्डमध्ये नोंद केली आहे. ही पुण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच स्व. सुषमा स्वराज बचतगट प्रशिक्षन केंद्र सभागृह, नवले ब्रिज येथे मोठ्या उत्सवात पार पडला, कार्यक्रमास ५०० पालकांनी व ५०० विद्यार्त्यांनी हजेरी लावली होती. या प्रसंगी महाराष्ट्र लेडीज़ असोसिएशन ग्रुपच्या अभिलाषा बेलुरे, जिज्ञासा एजुकेशन आणि सोशल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. शिवाजी टकले, यांच्या शुभहस्ते मुलांना गौरविण्यात आले. त्यावेळी त्यांच्याकडून पालक व मुलांना मोलाचे मार्गदर्शन लाभले. या प्रसंगी बोलताना सुजाता हलवाई म्हणाल्या की मुलांनी गणिताला न घाबरता गंमतीने गणिते कशी सोडवावी तसेच गणिताशी मैत्री करून गुण कसे वाढवावे याचे अनमोल मार्गदर्शन करत काही क्लुपत्या सादर करून दाखविल्या.**

## नॉर्दर्न लाईट्सच्या पर्यटनाची संधी



**पुणे (आरंभ पर्व) : प्रकृतीच्या अद्भुत आणि भुरळ घालणाऱ्या चमत्कारांपैकी एक म्हणजे नॉर्दर्न लाईट्स (Aurora Borealis). या अद्वितीय दृश्याचा आनंद घेण्याची संधी आता जॉय एन क्रू या भारतातील प्रीमियम ट्रॅव्हल ब्रँड तर्फे पर्यटकांना उपलब्ध झाली आहे. उबदार ग्लास इग्लू मध्ये झोपण्याचा अनुभव, स्नोमोबाईल आणि रेनडिअर स्लेज वरून ऑरोराचा पाहणे, तसेच बर्फाळ समुद्रात आइसब्रेकर क्रूझ ही प्रवासाची वैशिष्ट्ये आहेत. जॉय एन क्रू सोबत ही स्वप्नवत आर्क्टिक सफरची टूर केवळ पाहण्याचीच नाही, तर जगण्याची एक अविस्मरणीय अनुभूती ठरणार आहे. ही संपूर्ण यात्रा आराम, लक्झरी आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाने परिपूर्ण असून नॉर्वे, फिनलंड आणि आइसलँड या स्कँडिनेव्हियन देशांमध्ये जॉय एन क्रू कडून गट प्रवास तसेच व्यक्तिगत प्रवास यांचे पर्याय दिले जातात. प्रत्येक टूर ही फक्त पर्यटन न राहता, एक आयुष्यभराची आठवण बनावी असा उद्देश या ब्रँडचा असतो. "Your Joy, Our Crew" हे ब्रँडचे ब्रीदवाक्य असून त्यानुसार प्रत्येक ग्राहकासाठी व्हिसा सहाय्यता, उबदार थर्मल गिअर, तात्काळ मदत आणि स्थानिक सांस्कृतिक अनुभवांची आखणी अगदी काटेकोरपणे केली जाते. याशिवाय, ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष गट टूर उपलब्ध असून त्यात आरामदायक वेळापत्रक, अधिक सुविधा आणि आपुलकीने बांधलेले वातावरण यावर भर दिला जातो. प्रवास नव्याने करणारे असोत किंवा अनुभवी ट्रॅव्हलर जॉय एन क्रू तर्फे ची ही नॉर्दर्न लाईट्स टूर म्हणजे एक संपूर्ण सजीव अनुभव आहे, ज्यामध्ये आनंद, शांतता आणि विस्मय यांचा मिलाफ आहे.**

# कोनिका मिनोल्टाने मेट्रो ट्रेनच्या माध्यमातून ब्रँड मार्केटिंग मोहिमेचा दुसरा टप्पा केला सुरु

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**




डिजिटल प्रॉडक्शन प्रिंटिंग आणि व्यवसाय सोल्यूशन्स क्षेत्रात आघाडीवर असलेल्या कोनिका मिनोल्टा बिझनेस सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. या कंपनीने देशभरात मेट्रो ट्रेनद्वारे ब्रँड मार्केटिंग मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात केली. या दुसऱ्या टप्प्यासह यशाचे नवे शिखर गाठत ही मोहीम दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, हैदराबाद, चेन्नई आणि कोलकाता या सहा प्रमुख महानगरांमध्ये राबवली जात आहे.

यावर्षीच्या सुरुवातीस दिल्ली आणि मुंबईत यशस्वीपणे झालेल्या प्रारंभिक उपक्रमाच्या यशावर आधारित, कोनिका मिनोल्टाची ही व्यापक मोहीम आता आणखी विस्तारली जात आहे. हा उपक्रम २३ जून पासून दिल्ली, मुंबईतून सुरू होईल आणि उर्वरित शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने विस्तारत जाईल.

'शेपिंग न्यू हाइट्स, टुगेदर' आणि 'इंडिया प्रिंट्स ऑन कोनिका मिनोल्टा' या मोहिमेच्या संकल्पनेखाली, कोनिका मिनोल्टा कंपनीने मेट्रो ट्रेनच्या बाह्य आणि अंतर्गत भागांवर आकर्षक ब्रँडिंगद्वारे नवकल्पना आणि सहकार्याची आपली दृष्टी स्पष्टपणे मांडली आहे.

बाह्य ब्रँडिंगमुळे संपूर्ण शहरात दृश्यमानता वाढते, तर अंतर्गत सजावट प्रवाशांना कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओ आणि मुख्य व्यवसाय सोल्यूशन्सबद्दल सविस्तर माहिती देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामुळे त्यांच्याशी अधिक प्रभावी संवाद साधता येतो. या उपक्रमाबाबत कोनिका मिनोल्टा बिझनेस सोल्यूशन्स इंडिया प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. कात्सुहिसा असारी म्हणाले, "या व्यापक ब्रँडिंग मोहिमेद्वारे आपण भारतातील सर्वात गतिशील शहरांमध्ये ब्रँड ओळख निर्माण करण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यात प्रवेश करत आहोत. प्रत्येक मेट्रो ट्रेन ही आमच्या तंत्रज्ञानातील प्रगतीचे फिरते प्रदर्शन आहे. आमच्या ग्राहकांसाठी आणि भागीदारांसाठी, ही मोहीम कोनिका मिनोल्टा भारतात अधिक सखोल, एकात्मिक आणि उद्याच्या बदलत्या व्यावसायिक गरजांशी सुसंगत अशा वाढीच्या पुढील टप्प्यासाठी सज्ज असल्याचे स्पष्ट संकेत देते.

या आधी डिजिटल OOH, वन पॉवरहाऊस, आणि प्रिंट एक्सप्रेस यांसारख्या प्रभावी ब्रँडिंग उपक्रमांमध्ये सातत्याने गुंतवणूक करणाऱ्या कोनिका मिनोल्टाने, आता सुरू केलेली मेट्रो मोहीम ही व्याप्ती, पोहोच आणि अनुभवात्मक सहभाग या दृष्टीने एक मैलाचा दगड ठरत आहे.

शहरी भारत वेगाने विकसित होत असताना आणि डिजिटल प्रिंटिंग आधुनिक व्यवसायांचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरत असताना, कोनिका मिनोल्टा दररोज लाखो प्रवाशांशी संवाद साधत आपली उपस्थिती अधिक बळकट करत आहे. त्यासोबतच प्रगतीतील एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक दृढ करत या क्षेत्रात आघाडीवर राहण्याची खात्रीही देत आहे.

## थोडक्यात



### शिशुविहार एरंडवणे माध्यमिक विद्यालयापासून मुक्ताचे सत्र

पुणे (आरंभ पर्व) : मुक्ता चॅरिटेबल फाउंडेशनच्या "शाळा पुस्तकांच्या पलीकडे" या प्रकल्पाला २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात एरंडवणे येथील शिशुविहार माध्यमिक विद्यालयातून झाली. २०१५ पासून सुरू असलेल्या या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना जीवन कौशल्ये तसेच लैंगिक आरोग्याविषयी जागरूक करणे, त्यांना भावनिकदृष्ट्या सक्षम बनवणे आणि संवाद कौशल्य विकसित करणे हा आहे. इयत्ता आठवी, नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या या सत्रांचे पहिले सत्र नुकतेच पार पडले. शाळेचे मुख्याध्यापक मा. सतीश केंगर सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सत्राचे मार्गदर्शन मा. दीपाली क्षीरसागर, ऋषिकेश भंडारे आणि मुकेश सावकारे यांनी केले. या सत्रात सुमारे १९० विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांकडून अनेक प्रश्न विचारण्यात आले, ज्यात – "स्वतःची ओळख निर्माण कशी करावी?", "नाती सांभाळताना अडचणी येतात, काय करावे?", "मैत्रिणीने संवाद तोडला, त्याने मानसिक त्रास होतो, काय करू?" यांसारखे प्रश्न समोर आले. सत्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या शंका शांतपणे दूर केल्या तसेच सर्व विद्यार्थ्यांना मुक्ता मेंटल हेल्थ हेल्पलाईन (७८८७८८९८८२) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले. या सत्राच्या आयोजनात शाळा प्रशासनाने सक्रिय सहभाग घेतला आणि मोलाची मदत केली.




### रायन इंटरनॅशनल अकॅडमीने केले लिटररी कॉन्क्लेव्ह २०२५चे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडी शाळेने प्रतिष्ठेच्या लिटररी कॉन्क्लेव्ह २०२५ चे यजमानपद अभिमानाने भूषविले आणि विजेतेपदावरही आपले नाव नोंदविले तेव्हा सर्जनशीलता, भाषा आणि तारुण्यसुलभ जल्लोष यांच्या खळाळत्या लाटेने संस्थेचे वातावरण उत्साहित झाले. या आंतर-शालेय साहित्य सोहळ्याच्या निमित्ताने हिंजवडीमधील तसेच पुण्याच्या इतर भागांतील १९ प्रतिष्ठित शाळांतील विद्यार्थ्यांना एकत्र आणले व त्यातून बौद्धिक चर्चेचा उत्साह आणि अभिव्यक्तीची उत्कृष्टता यांनी शिगोशिग भरलेले वातावरण निर्माण झाले. मॉन्टेसरी ते इयत्ता नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या या कार्यक्रमातील विविध विचारप्रवर्तक आणि मनोवेधक स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली साहित्यिक प्रतिभा प्रदर्शित करण्याची संधी मिळाली. कथाकथनापासून ते नाट्यीकरणापर्यंत ते उत्स्फूर्त भाषणांपासून ते सर्जनशील लेखनापर्यंत प्रत्येक उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपल्या भाषिक सामर्थ्याची व अभिव्यक्तीची खोली धुंडाळण्यास प्रोत्साहन मिळाले. निकोप स्पर्धा, सहयोग आणि साहित्यासाठीच्या प्रेमाच्या उर्मीने शाळेच्या कॅम्पसमध्ये एकच उत्साह पसरला होता. रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीने कष्टपूर्वक केलेल्या नियोजनाने व उत्साहाने या संपूर्ण संमेलनाचे केवळ समन्वयनच केले नाही तर दिवसभर लक्षणीय सादरीकरणेही प्रदर्शित केली. शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वत:ला झोकून देत केलेले प्रयत्न, त्यांची तयारी आणि ध्यास यांची फलश्रुती म्हणजे शाळेला संपूर्ण संमेलनाची विजेती शाळा म्हणून घोषित करण्यात आले व हा विजय शाळेशी संबंधित सर्वांसाठी अभिमानाचा व आनंदाचा ठरला. या सोहळ्याला उत्साही शिक्षणतज्ज्ञ, मुलांबद्दलच्या अभिमानाने आनंदित झालेले पालक आणि प्रतिष्ठित परीक्षकमंडळ यांची सन्माननीय उपस्थिती लाभली व यापैकी प्रत्येकानेच शाळेतर्फे करण्यात आलेले उत्तम आयोजन, सहभागी स्पर्धकांचा स्तर आणि यानिमित्ताने प्रत्येक युवा स्पर्धकाच्या मानसिक प्रगल्भतेत दिसून आलेली वाढ यांची वाखाणणी केली. लिटररी कॉन्क्लेव्हची सांगता मोठ्या उत्साहात झाली व या सोहळ्याने उपस्थितांच्या मनात कायम जपल्या जातील अशा आठवणी दिल्या, युवा मनांना प्रेरणा दिली आणि शब्दांच्या ताकदीबद्दल एक नवा आदर तयार केला. या यशाद्वारे रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीने भावी विचारवंत, वक्ते आणि कथाकारांच्या बुद्धिमत्तेला खतपाणी देणारी संस्था म्हणून आपले स्थान पुन्हा एकदा सिद्ध केले.

# सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात चाकणकरांच्या उपस्थितीत आढावा बैठक

## नऱ्हे परिसरातील समस्यांवर भूपेंद्र मोरे यांची ठाम मांडणी, रूपाली चाकणकर यांच्याकडून कौतुक

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयात महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली ताई चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

बैठकीत नऱ्हे, नवले ब्रिज परिसर तसेच सिंहगड रोड हद्दीतील पाणी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, वेश्याव्यवसाय व वाहतूक कोंडी यांसारख्या अनेक प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीला सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार-पवार, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्ते राहुल पोकळे, सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे, सौरभ मते, सागर कोल्हे, विकास हगवणे, भाग्यश्री कामटे, सायली टिळेकर, विठ्ठल सूर्यवंशी, राजेभाऊ जाधव, सुरज दांगडे यांच्यासह स्थानिक नागरिक आणि अधिकाऱ्यांची मोठी उपस्थिती होती.

**भूपेंद्र मोरे यांची ठाम भूमिका** : राष्ट्रवादी काँग्रेस खडकवासला विधानसभा कार्याध्यक्ष भूपेंद्र मोरे यांनी नागरिकांच्या वतीने अनेक ज्वलंत प्रश्न बैठकीत ठामपणे मांडले.




विशेषत:

- नालेसफाई न झाल्याने होणारे दुर्गंधी आणि पाणी साचण्याचे प्रश्न
- नवले ब्रिज परिसरात सुरू असलेला वेश्याव्यवस्था
- रस्त्यांवरील कचऱ्याचे ढिगारे आणि वाहतूक कोंडीची समस्या
- नऱ्हे परिसरात स्ट्रीट लाईट व इतर मूलभूत सुविधांचा अभाव

हे सर्व मुद्दे अत्यंत तळमळीने त्यांनी चाकणकर यांच्यासमोर मांडले. याशिवाय, काही आठवड्यांपूर्वी भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या चक्काजाम आंदोलनानंतर प्रशासनाने सुरू केलेल्या कामांविषयी त्यांनी समाधान व्यक्त करत, उर्वरित प्रश्नांवर तात्काळ उपाययोजना व्हाव्यात, अशी मागणी केली.

माध्यमांशी संवाद साधताना चाकणकर म्हणाल्या, "भूपेंद्र मोरे हे जनतेसाठी झटणारे, तडफदार नेतृत्व आहे. आंदोलने करणे ही केवळ राजकारणासाठी नसून, जनतेच्या हितासाठी असावी लागते आणि मोरे यांनी हे अचूक दाखवून दिले. अशा लोकप्रतिनिधींचे खरे कौतुक व्हायला हवे."

या बैठकीच्या शेवटी सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार-पवार यांनी प्रशासनाच्या वतीने आश्वासन दिले की,

"बैठकीमध्ये मांडले गेलेले सर्व मुद्दे प्राधान्याने नोंदवून घेण्यात आले असून, संबंधित विभागांमार्फत लवकरात लवकर उपाययोजना केली जाईल."

नऱ्हे परिसरातील जनतेच्या समस्या पुन्हा एकदा स्पष्टपणे पुढे आल्या असून, या बैठकीच्या माध्यमातून त्यावर त्वरित आणि प्रभावी उपाययोजना होण्याची अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

### तात्काळ निर्देश व कौतुक




**भूपेंद्र मोरे यांनी मांडलेल्या मुद्द्यांची रूपाली चाकणकर यांनी गंभीर दखल घेतली. उपस्थित महापालिका अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत विचारणा केली व तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले.**

## हिंजवडीत रुग्णवाहिकेच्या प्रतीक्षेतील तरुणी कायमची अपंग

**हिंजवडी (दै. आरंभ पर्व)**

भरधाव अवजड डम्परने दुचाकीस्वार तरुणीला धडक देत तीच्या अंगावर वाहन घातले. तीचा डावा पाय चाकाखाली अडकला. या घटनेनंतर चालक पळून गेल्याने तब्बल अर्धा तास तरुणी चाकाखाली विव्हळत पडली होती. वेळेत उपचार मिळू न शकल्याने अति रक्तस्त्राव व सेप्टिक होऊन तीचा डावा पाय डॉक्टरांना कमरेपासून काढावा लागला. ही हृदयद्रावक घटना सोमवारी (ता. ३०) दुपारी दोनच्या सुमारास ताथवडे येथील अंडरपास समोर घडली. स्वरा संजय पवार (वय. ३६, रा. रोहन अनंता सोसायटी, ताथवडे) असे त्या तरुणीचे नाव असून त्यांच्यावर थेरगावातील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागगात उपचार सुरु आहेत. याबाबत हिंजवडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी, स्वरा ह्या दुपारी दोनच्या सुमारास कामावरून येत त्याच वेळी त्यांचा मुलगा देखील शाळेतून सुटत असल्याने त्याला दुचाकीवरुन घरी घेऊन जात सोमवारी त्या कामावरून घरी जात असताना समोरून भरधाव आलेल्या हायवा डम्परने त्यांना जोरदार धडक दिली. डंपरचे पुढील चाक त्यांच्या अंगावर गेले. तेव्हा डंपर आहे त्याच अवस्थेत सोडून चालकाने पळ ठोकला. जमलेल्या लोकांनी त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला मात्र, सर्वांचाच नाईलाज झाला.

## "मेडी आयकॉन भारत इंटरनॅशनल" पुरस्कार सोहळा पुण्यात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या विविध राज्यांत आरोग्यसेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या महिला डॉक्टरांचा गौरव करणारा "मेडी आयकॉन – भारत इंटरनॅशनल २०२५" पुरस्कार सोहळा नुकताच वाकड येथे अत्यंत भव्यतेने पार पडला. या कार्यक्रमाला राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महिला डॉक्टरांच्या कार्याचे मनापासून कौतुक केले आणि त्यांना समाजातील परिवर्तनाचे शिल्पकार ठरवले. या पुरस्कार सोहळ्यात "मेडीक्वीन भारत इंटरनॅशनल मिस मिसेस २०२५" सौंदर्य स्पर्धाही पार पडली. यामध्ये आरोग्यसेवेत कार्यरत महिला डॉक्टरांनी सहभाग घेतला. स्पर्धेसाठी सेलिब्रिटी पाहुणे म्हणून



अभिनेता राकेश बापट यांनी उपस्थिती लावली. या कार्यक्रमाचे आयोजन "मेडीक्वीन भारत इंटरनॅशनल" या संस्थेने केले होते. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी शुभेच्छा संदेश पाठवून सर्व पुरस्कार्थी डॉक्टरांचे अभिनंदन केले. कार्यक्रमात विविध राज्यांतील नामवंत डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.

# आ. शेखर निकम यांचा कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी ठाम आवाज

## पावसाळी अधिवेशनात विधिमंडळाच्या कलम २९३ अंतर्गत प्रस्तावावर सशक्त मांडणी

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार शेखर निकम यांनी कोकण विभागातील विविध प्रश्न, विकासाच्या योजना, शेतकऱ्यांच्या अडचणी, आणि सामाजिक सुविधा याविषयी ठाम व अभ्यासपूर्ण भूमिका घेत स्पष्टपणे सरकारचे लक्ष वेधले. विधिमंडळाच्या कलम २९३ अंतर्गत मांडलेल्या प्रस्तावात कोकणच्या सर्वांगीण आणि संतुलित विकासासाठी त्यांनी अनेक मुद्दे स्पष्ट केले.




त्यांनी सर्वप्रथम मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामांकडे लक्ष वेधले. गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने मागणी करूनही हा महामार्ग अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही. यावर्षी तरी हे काम पूर्ण होणार का, असा प्रश्न त्यांनी सरकारपुढे उपस्थित केला. दाभोळ ते पेढे जलमार्ग क्रमांक २८, रो-रो वाहतूक सेवा, खाडी खोलीकरण, पर्यटनवाढ आणि पूरनियंत्रण यासाठी बंदरविकास तातडीने आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कोकणातील जलमार्गाचा उपयोग वाढवून वाहतूक, उद्योग आणि पर्यटन यांना चालना मिळेल, असे त्यांनी अधोरेखित केले.

शेतकऱ्यांच्या संदर्भात त्यांनी स्पष्ट भूमिका घेतली की, ३० वर्षांपूर्वी अधिग्रहित केलेली जमीन जर सरकारने वापरलीच नाही, तर ती शेतकऱ्यांना परत द्यावी किंवा त्यावर विकास करून संबंधितांना योग्य मोबदला मिळावा.

सौरऊर्जेसंदर्भात कोकणातील हवामान लक्षात घेता सौर पंप योजना अनेक ठिकाणी उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे केवळ ज्यांच्याकडे विजेचे कनेक्शन आहे, त्यांनाच सौर पंप लाभावा, अशी सूचना त्यांनी केली. रत्नागिरी जिल्ह्यासाठी स्वतंत्र सौर कोटा उपलब्ध करून द्यावा, अशी ठाम मागणीही त्यांनी केली.

रत्नसिंधू योजना ही पर्यटन, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक व्यवसायांसाठी उपयुक्त ठरलेली असून, ती योजना पुन्हा सुरू करण्याची गरज त्यांनी स्पष्टपणे मांडली.

छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक कोकणात भव्य स्वरूपात उभारावे, आणि चिपळूण-आलोय परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा प्रबोधिनी उभारावी, अशी मागणी त्यांनी अधिवेशनात ठासून मांडली. ग्रामीण भागातील शिक्षणाच्या संदर्भात शिक्षकांच्या रिक्त जागा, विशेषतः इंग्रजी व गणिताचे शिक्षक उपलब्ध नसणे, ही गंभीर समस्या असून, त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे त्यांनी आवाहन केले. तसेच विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदान धोरण लागू करावे, अशी शिफारसही त्यांनी केली.

चिपळूण-कराड रेल्वेमार्गास गती मिळावी, चिपळूण शहरास वारंवार भेडसावणाऱ्या पुराचा कायमस्वरूपी उपाय म्हणून २५ कोटींच्या आराखड्यास तातडीने मंजुरी द्यावी, तसेच लहान धरणे आणि जलसंधारणावर अधिक भर दिला जावा, अशी मागणीही त्यांनी केली.

आ. शेखर निकम यांच्या या सखोल आणि अभ्यासू मांडणीमुळे कोकणच्या प्रश्नांना अधिक बळ मिळाले असून, त्याच्या मागण्यांकडे सरकार गांभीर्याने लक्ष देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


# दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक

## डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन; पहिल्या छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे काम दिवाळी अंकांनी केले आहे.

मन आणि मेंदूला बौद्धिक फराळ देऊन मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी दिवाळी अंक उपयुक्त ठरतात. खऱ्या अर्थाने दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाग्य घटक आहे," असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले.



दिनमार्क पब्लिकेशनच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात आयोजित स्वर्गवासी कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्‌घाटन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी माजी संमेलनाध्यक्ष डॉ. भारत सासणे, साहित्यिक व परीक्षक माधव राजगुरू, संयोजक दिनकर शिलेदार आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन येत्या शुक्रवारपर्यंत सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, "संत ज्ञानेश्वर महाराजांनीही दिवाळीतील अक्षर फराळाचा उल्लेख करताना ज्ञानाची दिवाळी, असे म्हटले आहे.

महाराष्ट्रातील दिवाळी अंकांना शंभरहून अधिक वर्षांची परंपरा आहे. मध्यमवर्गीय माणसाने दिवाळी अंकांना जीवित ठेवण्याचे काम केले.

स्पर्धेच्या काळात काही अंक अल्पायुषी ठरले, तर काहींनी तग धरून हा वारसा जपला. दिवाळी अंकांचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत गेले. आजघडीला चारशेहून अधिक अंक प्रकाशित होतात. ज्ञान आणि मनोरंजनाचे ध्येय गाठताना अप्रतिम मुखपृष्ठ, चित्रे, आशय संपन्नता, विषयांतील वैविध्यता मराठी वाचकांना समृद्ध करणारी आहे. एवढेच नाही, तर दिवाळी अंकांनी अनेक लेखक, साहित्यिक घडवले आहेत."

भारत सासणे म्हणाले, "दिवाळी अंकांची ही परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर गेली असून, मराठी व बंगाली भाषेत विशेष अंक निघतात. अनेक आव्हानावर मात करून ही परंपरा जाणाऱ्या संपादकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे. अंकांची संख्या वाढतेय, याचा आनंद आहे."

माधव राजगुरू म्हणाले की, अडीचशे तीनशे अंक वाचून समृद्ध झालो. वैविध्यपूर्ण आशय, मांडणी, संकल्पना अशा विविधतेने नटलेले हे अंक आहेत. ही स्पर्धा लेखकांना घडविणारी आहे. विविध प्रांतातील, भाषेतील, समाजातील हे अंक भारावून टाकणारे आहेत."

प्रास्ताविकात दिनकर शिलेदार म्हणाले, "या प्रदर्शनात २३५ दिवाळी अंक आहेत. वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांचे सादरीकरण एकाच छताखाली व्हावे, या उद्देशाने हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण आहे. दिवाळी अंकांची यशस्वी परंपरा जपण्यासह त्यांना प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन आहे." अन्वय बेंद्रे यांनी सूत्रसंचालन केले.



## थोडक्यात



### राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

पाथर्डी (आरंभ पर्व) : येथील राजर्षी शाहू महाराज पगारदार नोकरांची सहकारी पतसंस्थेची ८ वार्षिक सर्वसाधारण सभा (ता. २९) खेळीमेळीच्या व उत्सापूर्ण वातावरणात संपन्न झाली. पतसंस्थेचे संस्थापक/ अध्यक्ष दिगंबर गाडे यांनी पतसंस्था मागील आर्थिक वर्षात नफ्यात आली असल्याचे सांगून ठेवीदारांचा व सभासदांचा विश्वास संपादन झाल्याचे सांगितले. पगारदार नोकरांना कर्ज पुरवठा करणारी राजर्षी शाहू महाराज पतसंस्था पाथर्डीची ८ वी सर्वसाधारण सभा (ता. २९) सकाळी ११.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झाली. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष दिगंबर गाडे यांनी पतसंस्था सरलेल्या आर्थिक वर्षात नफ्यात आली असल्याची सांगितले तसेच पतसंस्था सहकारी विभागाच्या सर्व नियमांचे पालन करून चालविण्यात येत आहे. पतसंस्थेवर ठेवीदार व सभासदांचा विश्वास वृध्दिंगत होत आहे. पतसंस्थेचे सर्व कर्जदार नियमित फेड करीत असल्यामुळे व पतसंस्थेच्या नफ्यात दूरवर्षी वाढ होत आहे. पतसंस्थेच्या आर्थिक पत्रकाचे वाचन संचालक दिलीप तिजोरे यांनी केले. यावर्षी सभासदास ६.७५ टक्के लाभांश सर्वसाधारण सभा संपल्यानंतर देण्यात आला. संस्थेसाठी जागा खरेदीसाठी राखीव निधी, उपनिधी दुरुस्ती आदी महत्त्वाचे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. यावेळी पतसंस्थेचे व्हॉइस चेअरमन अरुण रोकडे, संचालक दिलीप तिजोरे, महेंद्र राजगुरू, अंबादास साठे, संदीप भागवत, कल्पजीत डोईफोडे, व्यवस्थापक रमेश लाटणे, राजेंद्र बोरुडे, राजेंद्र चव्हाण, बाळासाहेब सोनटक्के, अशोक डोंमकावळे, सतिश बडदे आदी उपस्थित होते.




### दादापाटील राजळे महाविद्यालयात करिअर संसदेची स्थापना

पाथर्डी (आरंभ पर्व) : तालुक्यातील दादापाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता करिअर संसदेची स्थापना करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजधर टेमकर यांनी दिली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात पाथर्डी-शेवगाव तालुक्याच्या आमदार मोनिका राजीव राजळे यांचे शुभहस्ते करिअर संसदेतील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. याप्रसंगी बोलतांना राजळे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी राजकीय प्रक्रियेमध्ये सकारात्मक दृष्ट्या सक्रिय होऊन आत्मविश्वासाने नेतृत्वगुण विकसित करून अपेक्षित सामाजिक व राजकीय बदलांमध्ये भरीव योगदान द्यावे, असे मत व्यक्त केले. करिअर संसदेमध्ये काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना महाविद्यालयीन जीवनात प्राप्त झालेल्या या संधीचा त्यांनी राजकीय जागृती करण्यासाठी उपयोग करून घ्यावा, असे आवाहन आमदार राजळे यांनी केले. या कार्यक्रमासाठी दादापाटील राजळे शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रामकिसन पाटील काकडे, त्याचबरोबर ज्येष्ठ नेते श्री. उद्धवराव वाघ, शिक्षण संस्थेचे सर्व संचालक मंडळ, अधिक्षक विक्रम राजळे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास युवा नेते श्री. कृष्णादादा राजळे यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. किशोर गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. चंद्रकांत पानसरे यांनी मानले.



### नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन

पाथर्डी (आरंभ पर्व) : नॅशनल इंटिग्रेटेड मेडीकल असोसिएशन पाथर्डी शाखेच्या वतीने 'डॉक्टर्स डे'चे औचित्य साधून पाथर्डीतील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात महाविद्यालयीन तरूणींसाठी "कळी उमलताना - तारूण्याच्या उंबरठ्यावर" या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पाथर्डीतील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.मनीषा खेडकर यांचे वरील विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.तारूण्यात येताना मुलींनी घ्यावयाची काळजी,भावनांच्या आवेगाला तोंड देण्याची पद्धती,शारिरीक, मानसिक,लैंगिक,सामाजिक,अध्यात्मिक आरोग्य जपताना राष्ट्रनिर्माण कार्यात युवतींचे योगदान,दैनंदिन आहार विहार व झोप यांची सुयोग्य सांगड,योग,मेडीटेशन व शिस्तबद्ध दिनचर्या,स्वतःचे सौंदर्य व व्यक्तिमत्व जपतांना घ्यावयाची काळजी यांवर सखोल मार्गदर्शन केले. डॉक्टर्स डे च्या निमित्ताने पाथर्डीच्या निमा संघटनेने आयोजित केलेल्या कार्यक्रमामागील भूमिका,राष्ट्रनिर्माणासाठी कुटूंब व कुटूंबासाठी स्त्रीची आरोग्यसंपन्नता अतिशय महत्वाची असल्याचे प्रतिपादन पाथर्डी निमाचे अध्यक्ष डॉ.श्रीधर देशमुख यांनी केले तर युवतींचे प्रबोधन व जागृती यासाठी निमा पाथर्डीने घेतलेला पुढाकार स्पृहणीय असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

# लिंपणगावच्या सिद्धेश्वर मंदिरातील अज्ञात चोरांकडून दानपेटी फोडली

## दानपेटीतील मोठी रक्कम चोरीला गेल्याचा अंदाज



**श्रीगोंदा तालुका (दै. आरंभ पर्व)**
श्रीगोंदा तालुक्यातील धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्यांनी फोडून त्यातील मोठी रक्कम चोरट्यांनी लंपास केली. मिळालेल्या माहितीनुसार लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराजांच्या मंदिरात भाविकांकडून सिद्धेश्वर महाराजांना पैशाच्या रूपाने दान करण्यासाठी यात्रा कमिटीकडून मंदिराच्या गाभाऱ्यात दानपेटी ठेवण्यात आली होती. परंतु सोमवारी रात्री अकरा वाजल्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी मंदिराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप कोंयडा तोडून मंदिरात प्रवेश केला. दानपेटी ही मंदिराच्या समोरच गाभाऱ्यात असल्याने अज्ञात चोरट्याने दानपेटी कटरच्या साह्याने तोडून त्यातील मोठी रक्कम लंपास केली. दरम्यान गावचे ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी अनेक भाविक व मंदिराचे पुजारी हे दररोज आरती घेण्यासाठी पहाटे चारच्या सुमारास मंदिरात येतात. परंतु मंदिरात प्रवेश करतेवेळी पुजारी व भाविकांना सदर मंदिराच्या प्रवेशद्वाराचे कुलूप तोडल्याचे दिसून आले. त्यानंतर ग्रामस्थ व पुजाऱ्यांना दानपेटी फोडल्याची जाणीव झाली. दानपेटी पाहिल्यानंतर दानपेटीच्या उजव्या बाजूची बाजू कटरच्या साह्याने फोडून त्यातील तीन ते चार महिन्यापूर्वी जमा झाल्याची रक्कम अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. त्यामध्ये एक चोरता दानपेटीतील रक्कम चोरी करताना सीसीटीव्ही मध्ये कैद झाला आहे. पुजाऱ्यांनी गावचे सरपंच सदस्य व यात्रा कमिटीला दानपेटी फोडण्याची माहिती दिल्यानंतर गावातील ग्रामस्थ कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने मंदिराकडे घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर या कार्यकर्त्यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात संपर्क साधून घडल्या घटनेची माहिती दिली.

त्यानंतर काही वेळातच श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक ज्ञानदेव भागवत व पोलीस कॉन्स्टेबल मनोज साखरे हे मंदिरातील चोरीच्या ठिकाणी घटनास्थळी दाखल झाले. फोडलेल्या दानपेटीची पाहणी केल्यानंतर चोरट्यांनी पुरावा नष्ट करण्यासाठी सीसीटीव्हीची स्क्रीनची केबल काढून दानपेटीची तोडफोड केली.

असल्याचे पोलीस व उपस्थित ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यामुळे तपासात काही वेळ अडचण आली. परंतु गावातीलच सीसीटीव्ही ऑपरेटरला बोलावून घेतल्यानंतर स्क्रीनची वायर जोडण्यात आली. त्यानंतर सीसीटीव्हीतील फुटेज पाहिल्यानंतर एक चोरटा मंदिरात प्रवेश करत दानपेटी फोडत असल्याचे फुटेजमध्ये देखील पोलिसांना मिळाले आहे. आता सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरटे जेरबंद करण्याचे आवाहन पुढे असणार आहे. या घटनेचा श्रीगोंदाचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक ज्ञानदेव भागवत व पोलीस कॉन्स्टेबल मनोज साखरे हे पुढील तपास करत आहेत.

दरम्यान ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार लिंपणगाव हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून या गावात अनेक छोट्या मोठ्या चोऱ्या गेल्या दोन महिन्यापासून होताना दिसत आहेत. काही ग्रामस्थांच्या शेळ्या चोरीला गेल्या आहेत त्याबरोबरच छोटे-मोठ्या चोऱ्या देखील चोरट्यांकडून होत आहेत. तर गावातील सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे देखील सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञात चोरट्यांनी गायब केल्याची माहिती देखील ग्रामस्थांमधून समजली. गाव परिसरातील चोरीला आळा घालण्यासारखा श्रीगोंदा पोलिसांनी रात्रीच्या वेळी ग्रस्त वाढवण्याची मागणी देखील ग्रामस्थांमधून होत आहे.

# पायी दिंडीमध्ये खासदार भाऊसाहेब वाकचौरे सहभागी!

- **वारकऱ्यांची विचारपूस करत पालखीचे घेतले दर्शन!**



**पंढरपूर (दै. आरंभ पर्व)**
"दिंडी चालली चालली विठ्ठलाच्या दर्शनाला... घुमे गजर हरिनामाचा, भक्त नामात रंगला..." अशा भक्तिमय वातावरणात, एकरूखे (ता. राहता) येथून पंढरपूरकडे निघालेल्या पायी दिंडी सोहळ्यात शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी वाटेत सहभागी होत वारकऱ्यांशी संवाद साधला. पालखीचे मनोभावे दर्शन घेत खासदार वाकचौरे यांनी हरिपाठाच्या गजरात सहभागी होत आपल्या श्रद्धेची प्रचिती दिली. यावेळी त्यांनी वारकऱ्यांची विचारपूस करत त्यांना आरोग्य व सुरक्षिततेबाबत आवश्यक सूचना दिल्या आणि त्यांच्यासाठी शासकीय पातळीवर होणाऱ्या सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. दिंडी सोहळ्याच्या निमित्ताने परिसरात उत्साहाचे वातावरण होते. खासदार वाकचौरे यांचा साधेपणा आणि भक्तिभाव पाहून वारकरी भारावून गेले. या धार्मिक यात्रेच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, भक्ती आणि परंपरेचे दर्शन पुन्हा एकदा घडल्याचे वारकऱ्यांचे मत होते. "माऊलीच्या चरणी नतमस्तक होत वारकऱ्यांचे सेवक म्हणून कार्य करत राहीन," अशी भावना खासदार वाकचौरे यांनी यावेळी व्यक्त केली.

# ग्राहकांच्या सेवेसाठी नेहमीच तत्पर - प्राचार्य मखरे



**श्रीगोंदा तालुका (दै. आरंभ पर्व)**
भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया ग्राहकांच्या सेवेसाठी नेहमीच तत्पर असल्याचे शारदा विद्या निकेतनच्या एन एस गुळवे ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य बी टी मखरे यांनी केले आहे.भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा श्रीगोंदा तेथे ७० व्या वर्धापन दिनानिमित्त शाखा प्रबंधक सुदर्शनसिंह रावत यांना शुभेच्छा देताना प्राचार्य मखरे यांनी सांगितले. प्राचार्य मखरे यांनी पुढे सांगितले की या घडीच्या काळात भारतीय स्टेट बँक ग्राहकांना चांगल्या प्रकारे सेवा देत असून फक्त ग्राहकांचे हित सांभाळत सामाजिक कार्यात देखील रावत यांनी चांगला पायंडा पाडला आहे त्यामुळे ग्राहकांची संख्या देखील वाढत आहे ही बाब कौतुकास्पद आहे असे ही प्राचार्य मखरे यांनी सांगितले.यावेळी डॉ.नानासाहेब कुरूमकर,विजय काटे प्रा.राम सोनवणे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष पिटर रणसिंग, दैनिक प्रभातचे तालुका प्रतिनिधी योगेश चंदन आदि मान्यवर उपस्थित होते.

**ICC महिला टी२० मानांकन**

# मानधना तिसऱ्या क्रमांकावर



**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
नॉटिंगहॅममधील पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात शानदार कामगिरी केल्यानंतर भारताची कार्यवाहक कर्णधार स्मृती मानधना आयसीसी महिला टी२० खेळाडू क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. इंग्लंडची वेगवान गोलंदाज लॉरेन बेल तीन विकेट्स घेत बेलला गोलंदाजांमध्ये कारकिर्दीतील सर्वोत्तम चौथे स्थान मिळवले आहे. ६२ चेंडूत ११२ धावा करून ९७ धावांचा दमदार विजय मिळवणारी मानधना तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे आणि कारकिर्दीतील सर्वोत्तम ७७१ रेटिंग गुण मिळवले आहेत.

मानधना आणि डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणी यांच्या पराक्रमामुळे यजमान संघाला ट्रेंट ब्रिज येथील पहिल्या सामन्यात सर्वात मोठा टी२० पराभव पत्करावा लागला, ज्याने पदार्पणात चार विकेट्स घेत ४५० व्या स्थानावर प्रवेश केला. मानधनाची सलामीची जोडीदार शफाली वर्मा २० धावा काढल्यानंतर एका स्थानाने पुढे सरकली असून ती १३ व्या स्थानावर पोहोचली आहे आणि हरलीन देओलने २३ चेंडूत ४३ धावा काढत ८६ व्या स्थानावर पुनरागमन केले आहे.

इंग्लंडची कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंटने ४२ चेंडूत ६६ धावा काढत संघासाठी सर्वाधिक धावा काढल्या आहेत. तिने २० रेटिंग गुण मिळवत कारकिर्दीतील सर्वोत्तम ६६३ गुण मिळवले आहेत आणि नववे स्थान कायम राखले आहे.



# पंचायत समिती जुन्नर येथे कृषी दिन साजरा

**शिवनेरी (दै. आरंभ पर्व)**
स्वर्गीय वसंतराव नाईक महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री यांच्या जयंतीनिमित्त पंचायत समिती येथे दि. १ जुलै रोजी कृषी दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी माजी सभापती विशाल तांबे, कृ उत्पन्न बा. स. संचालिका प्रियंका शेळके, शास्त्रज्ञ राहुल घाडगे, गटविकास अधिकारी प्रतीक चनावार, तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले, कृषी अधिकारी लक्ष्मण झांजे, विस्तार अधिकारी इत्यादी प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने व सहाय्यक कृषी अधिकारी व उप कृषी अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषी अधिकारी निलेश बुधवंत व आभार कृषी आत्मा सूर्यकांत विरनक यांनी मानले. गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावार यांनी सांगितले की, महाराष्ट्राला अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्ण करण्यामध्ये स्वर्गीय नाईक साहेबांचा असलेला वाटा तसेच राज्यामध्ये पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांची स्थापना करण्यामध्ये स्वर्गीय वसंतराव नाईक यांचा असलेला हातभार याबाबत ची माहिती गट विकास अधिकारी चन्नावार यांनी दिली . कृषी विभागाने अधिकचे सतर्क राहून येणाऱ्या खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना जास्तीत जास्त सेवा पुरवावी तसेच सहाय्यक कृषी अधिकारी यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे व तालुक्यातील खते व बियाणे यांचा पुरवठा व सनियंत्रण करावे असे सूचना मा. श्री विशाल शेठ तांबे सभापती पंचायत समिती जुन्नर यांनी दिल्या. आपला देश शेतीप्रधान असून शेतकरी जगला पाहिजे त्यासाठी शेतकऱ्याला आर्थिक व सामाजिक स्तर प्राप्त झाला पाहिजे व त्यासाठी कृषी विभागाने सर्व प्रयत्न करावेत असे आवाहन प्रियांका ताई शेळके यांनी सांगितले.

# नॅशनल डॉक्टर्स डे निमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा गौरव

## दैनिक समर्थ गांवकरीच्या "डॉक्टर्स डे विशेषांक"चे प्रकाशन!



**अहिल्यानगर (दै. आरंभ पर्व)**
डॉक्टर्स डे आणि राष्ट्रीय आरोग्य दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या उपस्थितीत एक प्रेरणादायी आणि सन्मानाची घटना घडली. जिल्ह्यातील ज्येष्ठ आणि कर्तव्यनिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सोनाली कुटे व डॉ. प्रदीप कुटे, आरोटे हॉस्पिटल चे डॉ. अतुल आरोटे व डॉ. सोनाली आरोटे, हरिश्चंद्र मेडीकल फाऊंडेशन संचलित कॉलेज ऑफ नर्सिंग आणि रिसर्च सेंटर संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. के. भांडकोळी तसेच अकोले हेल्थकेअर प्रा. लि.संचलित, अकोले हॉस्पिटल अकोले फार्मा संस्थापक मॅनेजिंग डायरेक्टर सौ. रुपालीताई प्रकाश वाकचौरे यांना या विशेष दिनानिमित्त शुभेच्छा देत त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या "डॉक्टर्स डे विशेषांक" चे प्रकाशनही डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते संपन्न झाले.

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी यावेळी बोलताना डॉक्टरांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, "देव माणसाच्या रूपात पृथ्वीवर आला आहे – ही ओळ ज्या व्यक्तींना समर्पित करता येईल, ते म्हणजे डॉक्टर. जेव्हा एखादा माणूस मृत्यूच्या दाराशी उभा असतो, वेदनेने विव्हळत असतो, त्या क्षणी त्याला आधार देणारी, आशेचा किरण दाखवणारी आणि त्याचे प्राण वाचवणारी व्यक्ती म्हणजे डॉक्टर. त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे."

यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी ब्राम्हणवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ही भेट दिली आणि नुकताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ 'आदर्श वैद्यकीय अधिकारी पुरस्कार' प्राप्त केलेल्या डॉ. बाबासाहेब सोनवणे यांच्याशी सौहार्दपूर्ण भेट घेतली. डॉ. सोनवणे यांच्या कार्याचे त्यांनी विशेष कौतुक केले व त्यांच्या सेवाभावाचे स्तुतिस्थान असल्याचे सांगितले.

यानंतर त्यांनी श्री सुखप्रदा हॉस्पिटलचे डॉ. सतीश वाळुंज आणि श्री दत्त क्लिनिकचे डॉ. प्रदीप कुमकर यांनाही प्रत्यक्ष भेटून डॉक्टर्स डेच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉक्टरांशी सविस्तर संवाद साधत त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात येणाऱ्या आव्हानांवर चर्चा केली आणि त्यांचे कार्य हे समाजाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले.

या विशेष कार्यक्रमामुळे वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, त्यांच्या कार्याची समाजात योग्य दखल घेतली जात असल्याचा विश्वास वाढला आहे.

डॉक्टर दिनाचे हे औचित्य सामाजिक सलोखा आणि वैद्यकीय कर्तव्य निष्ठेच्या जाणीवेने साजरे करण्यात आले. यामुळे जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना एक वेगळा प्रेरणादायी संदेश मिळाला असून, त्यांच्या कार्यात अधिक आत्मीयतेने आणि निस्वार्थ भावनेने झोकून देण्यासाठी ऊर्जा मिळाली आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.